## निशाण क्र. १६९ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ अ याने कागदपत्र दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार, सदरचे कागद या कामी महत्वाचे असून ते याकामी दाखल करणेचे आहेत. सबब सदर कागदपत्र दाखल करण्यास परवानगी मिळावी, अशी प्रस्तूत प्रतिवादी याने विनंती केली आहे.

२. वादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल करून हरकत घेतली आहे. त्याच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादींनी सदर कागदपत्रे उशिराने हजर केली आहेत. सबब प्रस्तूतचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती वादीने केली आहे.

३. प्रतिवादी क्र. १अ व वादी यांचे तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

४. सदर कागदपत्र हे वाद विषयाशी संबंधित आहेत असे दिसून येते. प्रस्तुत प्रतिवादी यांना हे कागदपत्र दाखल करण्यास परवानगी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्या सारखे होईल असे वाटते. परिणामी त्यांचे कशानेही भरून न येणारे अपरिमित नुकसान होईल असे वाटते. याउलट अशी परवानगी मंजूर केल्यास वादीचे कसलेही नुकसान होईल असे मला वाटत नाही. सदर कागदपत्र दाखल करण्यास परवानगी दिल्यास वाद विषयाचे गुणावगुणावर निवारण होण्यास मदतच होणार आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणे क्रमप्राप्त आहे असे वाटते. परंतू प्रस्तूत प्रतिवादीने सदरचे कागदपत्र दाखल करण्यास निश्चित विलंब केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे त्याबाबतचा खर्च प्रस्तूत प्रतिवादी देण्यास बंधनकारक आहे. परिणामी खालील आदेश पारीत करीत आहे :

# **आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/—
( बी.आर.पाटील )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

स्थळ : देवगड
दिनांक : १७/०७/२०१९